मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
पुणे, पिंपरी-चिंचवड
रविवार, दि. 18 मे 2025 | पान- 1

# महापालिकेत 498 अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या

## गट अ ते गट ड वर्गातील एकूण 498 अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मागील काही वर्षांत बदल्या झाल्या नाहीत. त्यात धोरणानुसार बदलीस पात्र अधिकारी, कर्मचाऱ्यांची माहिती तयार करूनही बदल्यांचे आदेश होत नव्हते. अखेर आयुक्त शेखर सिंह यांनी बदल्यांचे आदेश काढले आहेत. महापालिकेतील एकूण ४९८ अधिकारी, कर्मचाऱ्यांची खांदेपालट करण्यात आली आहे.



महापालिकेने उच्च न्यायालयाच्या आदेशाने २०१५ मध्ये बदली धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार पात्र अधिकारी कर्मचाऱ्यांच्या एप्रिल महिन्यात बदल्या करणे अपेक्षित आहे. अ आणि ब संवर्गातील तीन वर्षे झालेले, तर क संवर्गातील कर्मचारी सहा वर्षांनंतर बदलले पाहिजेत. मात्र, मागील काही वर्षात बदली धोरण डावलण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे. बदल्याच न झाल्यामुळे काही अधिकारी-कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच विभागात ठाण मांडून होते. मागील वर्षभरापासून बदल्यांसाठी पात्र अधिकारी, कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात आली. त्यांच्या बदल्यांचे प्रस्ताव आयुक्तांच्या टेबलावर होते. परंतु, बदल्याचे आदेश काढले जात नव्हते. अखेर आयुक्त सिंह यांना मुहूर्त मिळाला असून त्यांनी बदल्यांचे आदेश काढले आहेत.

गट अ ते गट ड वर्गातील एकूण ४९८ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले आहेत. स्थापत्य कार्यकारी अभियंता ६, उपअभियंता १०, कनिष्ठ अभियंता ४६, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक ६, प्रशासन अधिकारी २, विद्युत संवर्गातील कार्यकारी अभियंता १, उपअभियंता ७, कनिष्ठ अभियंता ८, कार्यालयीन अधिक्षक ५, सर्व्हेअर ५, आरेखक २, अनुरेखक ६, वीज पर्यवेक्षक ४. कॉम्प्युटर ऑपरेटर १८, मुख्य लिपिक ९३, लिपिक १४०, सहायक भांडारपाल ९, सफाई संवर्ग १४, लिफ्टमन २, मेन्टनस हेल्पर १, मजूर ६१, मुकादम २, शिपाई ५० अशा एकूण ४९८ अधिकारी, कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

# पीसीपीएल ट्वेंटी-20 क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू

## माणिकचंद ऑक्सिरीचच्या कार्यकारी संचालिका जान्हवी धारिवाल-बालन यांच्या हस्ते उद्घाटन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट संघटने तर्फे आयोजित आणि ऑक्सिरीच पुरस्कृत 'पिंपरी चिंचवड प्रीमीअर लीग' (पीसीपीएल) ट्वेंटी-२० क्रिकेट स्पर्धेत छत्रपती संभाजी किंग्ज आणि विश्व टायगर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला. स्पर्धेचे उद्घाटन माणिकचंद ऑक्सिरीचच्या कार्यकारी संचालिका जान्हवी धारिवाल-बालन यांच्या हस्ते करण्यात आले.

हिंजवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत विशाल गव्हाणे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे छत्रपती संभाजी किंग्ज संघाने बंट्स वॉरीयर्सचा १८ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या छत्रपती संभाजी किंग्ज संघाने १४५ धावा धावफलकावर लावल्या. अथर्व भोसले (४१ धावा), अजिंक्य खानदेशे (२४ धावा) आणि विशाल गव्हाणे (२० धावा) यांनी संघाचा डाव बांधला. बंट्स संघाच्या प्रशांत तेलंगे याने ४ गडी बाद केले. या आव्हानाला उत्तर देताना बंट्स वॉरीयर्सचा डाव १२७ धावांवर मर्यादित राहीला. निनाद सी. याने ३८ धावांची आणि प्रशांत तेलंगे याने २१ धावांची खेळी केली. छत्रपती संभाजी संघाच्या सईश शिंदे याने तीन गडी तर, विशाल गव्हाणे आणि हरीश बाकळे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाला शानदार विजयी सलामी मिळवून दिली.



दुसऱ्या सामन्यामध्ये अर्णेश रॉय याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर विश्व टायगर्स संघाने मोरे पाटील पॅकर्स संघाचा ७ धावांनी निसटता पराभव करून विजयी सलामी दिली. विश्व टायगर्सने पहिल्यांदा फलंदाजी करताना ७२ धावांचे लक्ष्य उभे केले होते. अर्णेश रॉय याने ३४ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना मोरे पाटील पॅकर्स संघाचा डाव ६५ धावांवर मर्यादित राहीला.

याआधी माणिकचंद ऑक्सिरीचच्या कार्यकारी संचालिका जान्हवी धारिवाल-बालन यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी, सचिव राजू कोतवाल, उपाध्यक्ष वसंतभाऊ कोकणे, संघमालक विजय कापसे, रवी शेट्टी, सुदाम मोरे-पाटी, आरती तांबोळी, सहसचिव दिलीपसिंह मोहिते, खजिनदार संजय शिंदे, स्पर्धा समितीचे विजय कोतवाल, प्रदीप वाघ, मुकेश गुजराथी, नरेंद्र कदम, प्रशांत तेलंगे, युसुफ बरहाणपूरे आदि मान्यवर उपस्थित होते.

### सामन्याचा संक्षिप्त निकाल: गटसारखळी फेरी

» छत्रपती संभाजी किंग्ज : १९.१ षटकात १० गडी बाद १४५ धावा (अथर्व भोसले ४१, अजिंक्य खानदेशे २४, विशाल गव्हाणे २०, प्रशांत तेलंगे ४-२४, सागर जाधव २-८) वि.वि. बंट्स वॉरीयर्सः १९ षटकात १० गडी बाद १२७ धावा (निनाद सी. ३८, प्रशांत तेलंगे २१, सईश शिंदे ३-१४, विशाल गव्हाणे २-१९, हरीश बाकळे २-६, ); सामनावीर : विशाल गव्हाणे.

» विश्व टायगर्स : १० षटकात ८ गडी बाद ७२ धावा (अर्णेश रॉय ३४, हर्षल हडके १३, सार्थक गायकवाड ३-९, रूद्र भुजबळ १-५, फैयाझ लांडगे १-८) वि.वि. मोरे पाटील पॅकर्सः १० षटकात ५ गडी बाद ६५ धावा (तिलक जाधव ३३, पुलकेश हलामुनी १२, शुभ श्रीवास्तव १२, सचिन सावंत १-७); सामनावीरः अर्णेश रॉय.

# पीएमआरडीएच्या उपक्रमांचा राज्यभरात डंका

## उत्कृष्ट सेवा सुविधांच्या बळावर मुख्यमंत्री-100 दिवस कार्यक्रमांतर्गत मिळाले तिसरे स्थान

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने गत काही दिवसात नागरिकांसाठी उभारलेल्या उत्कृष्ट सेवा - सुविधांची शासनाने दखल घेत मुख्यमंत्री - १०० दिवस कृती आराखड्याच्या उपक्रमात पीएमआरडीएला महाराष्ट्रात तिसरे स्थान मिळाले. गुणवत्ता परिषद भारत (क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया QCI) यांनी केलेल्या अंतिम मूल्यांकनात पीएमआरडीएला १०० पैकी ७६.०२ गुण मिळाले.




पीएमआरडीएने अल्प कालावधीतच सर्वसामान्य नागरिकांचे हित केंद्रस्थानी ठेवून उभारलेल्या अपेक्षित सोयी सुविधा आणि प्रशासकीय कामकाजातील गतीमानतेच्या आधारावर राज्य शासनाने त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीवर शुक्रवारी (दि.१६) शिक्कामोर्तब केले. प्रशासकीय कामकाजातील नाविन्यता, लोकाभिमुख प्रशासन व्यवस्था, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब अशा काही मुद्द्यांच्या आधारे पीएमआरडीएने आपले वर्चस्व या विशेष कार्यक्रमातून सिद्ध करत राज्यभरात अल्पावधीतच आपली छाप सोडली.

मुख्यमंत्री - १०० दिवस कृती आराखड्याच्या या दुसऱ्या टप्प्यातील विशेष उपक्रमात पीएमआरडीएसह राज्यभरातील ९५ महामंडळे, प्राधिकरणे, शासकीय / निमशासकीय संस्था, कंपन्या आदींचा समावेश होता. केंद्र शासनाची नामांकन करणारी अव्वल संस्था असलेल्या क्यूसीआय टीमने १४ मे २०२५ रोजी १० महत्त्वपूर्ण मुद्द्यांच्या अनुषंगाने केलेल्या मूल्यमापनात पीएमआरडीएने बाजी मारली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी जाहीर केलेल्या निकालात ७६.०२ गुणांच्या आधारे पीएमआरडीएला राज्यातून तिसरे स्थान मिळाले. पहिल्या क्रमांकावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ८२.१६ गुणांसह प्रथम तर महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने ७७.१९ गुण घेत दुसरे स्थान मिळवले. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण ६६.३७ गुणांसह चौथ्या तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ६५.१४ गुण मिळवत पाचव्यास्थानी राहिले.

" जनहित डोळ्यासमोर ठेवून उभारलेल्या सोयी सुविधा आणि प्रशासकीय कामकाजात शासनाला अपेक्षित असलेल्या गतिमानतेच्या आधारावर पीएमआरडीएला मिळालेले हे मोठे यश आहे. मुख्यमंत्री - १०० दिवसाच्या कार्यक्रमात आमच्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतलेली मेहनत आणि लोकप्रतिनिधी, नागरिकांचे सहकार्य या आधारावर पीएमआरडीएच्या निर्मितीपासून अल्पावधीतच आम्ही राज्यात नावलौकिक मिळवू शकलो हे आमच्यासाठी गौरवास्पद आहे. आगामी काळात पीएमआरडीएतील सोयी सुविधा, प्रशासकीय सेवा या अधिकाधिक लोकाभिमुख कशा करता येतील, त्या दृष्टीने आमचे प्रयत्न असतील.

**- डॉ. योगेश म्हसे, महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पीएमआरडीए.**

### या निकषांवर झाले मूल्यमापन

**» क्यूसीआय टीमने विविध १० मुद्द्यांच्या अनुषंगाने मूल्यमापन करून आपला अहवाल राज्य शासनाला सादर केला होता. यात संकेतस्थळ, केंद्र शासनाची सुसंवाद, स्वच्छता, तक्रार निवारण, कार्यालयीन सोयी सुविधा, कामकाजातील सुधारणा, अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी, न्यायालयीन बाबी, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, सुकर जीवनमान, कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा या निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात आले.**

# बालभारती-पौड फाटा रस्त्याला स्थगिती

## सर्वोच्च न्यायालयाच्या उच्चस्तरीय समितीचे राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूककोंडी सोडविण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या बहुचर्चित बालभारती ते पौड फाटा या रस्त्याच्या कामाला स्थगिती देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या उच्चस्तरीय समितीने ही स्थगिती दिली असून, सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या याचिकेवर निर्णय होत नाही, तोपर्यंत या रस्त्यावर कोणतेही काम करू नये, असे पत्र उच्चस्तरीय समितीने राज्याच्या मुख्य सचिवांना पाठविले आहे. यामुळे या रस्त्याचे काम रखडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विधी महाविद्यालय, तसेच कर्वे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बालभारती ते पौड फाटा हा रस्ता प्रस्तावित आहे. अनेक वर्षांपासून हा रस्ता तयार करण्याचे नियोजन महापालिकेच्या पथ विभागाकडून करण्यात येत आहे. या रस्त्याला पर्यावरणप्रेमींचा विरोध असून, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. तीन महिन्यांपूर्वी या रस्त्याच्या विरोधात उच्च न्यायालयात नागरी चेतना मंचाने दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावून या कामावरील स्थगिती उठविली होती. त्यामुळे महापालिकेला दिलासा मिळाला होता. या रस्त्याबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेवर अद्यापही कोणताही निर्णय झालेला नाही.



दरम्यान, बालभारती ते पौड फाटा रस्त्यामुळे पर्यावरणाची हानी होणार असून, तेथे रस्ता केल्यास डोंगर उतार, डोंगरमाथ्याचे नुकसान होणार असल्याचा अर्ज गेल्या वर्षी, २०२४ मध्ये वेताळ टेकडी बचाव समितीने सर्वोच्च न्यायालयाच्या उच्चस्तरीय समितीकडे केला होता. या अर्जाची दखल घेऊन समितीने राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठविले आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर निर्णय होत नाही, तोवर बालभारती-पौड फाटा रस्ता प्रकल्पासाठी कोणतेही बांधकाम करू नये, अशा सूचना या पत्रात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे येथे कोणत्याही प्रकारचे बांधकाम आता महापालिकेला करता येणार नसल्याचे वेताळ टेकडी बचाव समितीच्या सदस्य प्राजक्ता दिवेकर यांनी सांगितले.

बचाव समितीच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या अर्जावर सुनावणी देताना उच्चस्तरीय समितीने, 'हा रस्ता 'डीम्ड फॉरेस्ट'मधून जातो. तेथे बांधकाम केल्यास, ते टी. एन. गोदावरमन विरुद्ध भारतीय संघ आणि इतर खटल्यांतील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन ठरेल. त्यामुळे यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत कोणतेही बांधकाम करू नये,' असे स्पष्ट केले आहे. यामुळे या रस्त्यावर महापालिकेला कोणतेही बांधकाम करता येणार नाही. उच्चस्तरीय समितीने या पत्राची प्रत मुख्य सचिवांसह पुणे महापालिकेलादेखील पाठविली असल्याचे दिवेकर यांनी स्पष्ट केले.

" बालभारती ते पौड फाटा रस्त्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होणार असल्याने स्थानिक रहिवाशांचा सुरुवातीपासूनच याला विरोध होता. हा रस्ता करणे महत्वाचे कसे आहे, हे पटवून देण्यास महापालिका वारंवार अपयशी ठरली आहे. पर्यावरणासाठी घातक ठरणाऱ्या या रस्त्याला नागरिकांचा विरोध आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या उच्चस्तरीय समितीने दिलेल्या निर्णयामुळे नागरिकांना आणि पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**– डॉ. मेधा कुलकर्णी, खासदार.**

# पीएमआरडीएची मेट्रो 'स्लो'; स्थानकांची कामे अपूर्णच

## प्राधिकरण प्रशासनाकडून मार्गाचे 86 टक्के कामे पूर्ण झाल्याचा दावा; उर्वरित 14 टक्के काम कधी पूर्ण होणार, असा प्रश्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानकांची अपूर्ण कामे, पॅचवर्कचे निखळून पडलेले तुकडे, दुभाजकात टाकण्यात आलेला राडारोडा यामुळे पीएमआरडीएच्या मेट्रोचे काम संथगतीने सुरू असल्याचे चित्र आहे. माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाची काही ठिकाणी पाहणी केल्यानंतर कामाबाबत ढिसाळपणा दिसून आला. मात्र, पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण प्रशासनाकडून मेट्रो मार्गाचे 86 टक्के कामे पूर्ण झाल्याचा दावा करण्यात येत आहे, परंतु उर्वरित 14 टक्के काम कधी पूर्ण होणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

हिंजवडी आयटीनगरीत काम करणारे तसेच सर्वसामान्य नागरिकांना प्रतीक्षा असलेल्या माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे काम पुढे सरकत नसल्याचे चित्र आहे. मार्च 2025 त्यानंतर सप्टेंबर 2025 मध्ये मेट्रो ट्रॅकवरून धावेल, असे सांगितले जात होते. आता ही मेट्रो सुरू होण्यास 2026 उजाडेल, असे सांगण्यात येत आहे. दरम्यान, पीएमआरडी प्रशासनाकडून मेट्रोच्या कामाची गती वाढली असून, लवकरच सर्व कामे पूर्ण होतील, असे सांगण्यात येत आहे.

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र, वाहतूककोंडी कमी झाली नाही. त्यामुळे याला सक्षम पर्याय म्हणून मेट्रोचा पर्याय पुढे आला. प्रत्यक्षात सन 2021 मध्ये या मेट्रोच्या कामाला सुरुवात झाली. त्यानंतर सन 2022 मध्ये या प्रकल्पाचा पहिला पिलर उभा राहिला. मात्र, विविध परवानग्या, वाहतूक आणि जागेच्या ताब्याअभावी मेट्रोच्या कामाला विलंब होत गेला. त्यातच टप्प्याटप्प्याने स्थानकेही वाढली. पीपीपी तत्त्वावर विकसित होणारा हा मेट्रोचा आणि पीएमआडीएकडून उभारणार हा पहिलाचा प्रकल्प आहे. तत्कालीन महानगर आयुक्तांनी मेट्रो कामाकडे लक्ष न घातल्याने मेट्रोबाबत तक्रारी वाढल्या होत्या. मात्र, आता या कामाची गती वाढली असल्याचे सांगण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवड व पुणे येथून येणाया आयटीयन्सची संख्या मोठी आहे. रस्त्यावरील सततची वाहतूककोंडी, पावसाळयात साचणारे पाणी, सार्वजनिक वाहतुकीचा अभाव, हिंजवडीतील खराब रस्ते आणि पार्किंग अशा अनेक कारणांमुळे सर्वसामान्यांना या मेट्रो सेवेची प्रतीक्षा आहे. गेल्या तीन वर्षांपासून मेट्रो सुरू होईल, असे सांगण्यात येत आहे

मेट्रो कामावेळेस पडलेले खड्डे अद्यापही बुजविण्यात आलेले नाहीत. गेल्या वर्षीदेखील ही कामे अपूर्ण असल्याने मेट्रोच्या संबंधित ठेकेदारांना सांगण्यात आले होते. अखेर ठेकेदारास नोटीस देण्यात आली आहे. यंदाही या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक अभियंता नेमला आहे.



### पावसाळापूर्व कामे होणार का ?

» मेट्रोचे बांधकाम पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, मेट्रो कामावेळेस पडलेले खड्डे अद्यापही बुजविण्यात आलेले नाहीत. गेल्या वर्षीदेखील ही कामे अपूर्ण असल्याने मेट्रोच्या संबंधित ठेकेदारांना सांगण्यात आले होते. अखेर ठेकेदारास नोटीस देण्यात आली आहे. यंदाही या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक अभियंता नेमला आहे. तसेच, पीएमआरडीएकडूनही या कामावर देखरेख ठेवण्यात येत आहे.

### आयटीयन्सच्या नशिबी प्रतीक्षाच

» माण, हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रोसेवेची आयटीयन्सना सर्वाधिक प्रतीक्षा आहे. पिंपरी-चिंचवड व पुणे येथून येणाया आयटीयन्सची संख्या मोठी आहे. रस्त्यावरील सततची वाहतूककोंडी, पावसाळयात साचणारे पाणी, सार्वजनिक वाहतुकीचा अभाव, हिंजवडीतील खराब रस्ते आणि पार्किंग अशा अनेक कारणांमुळे सर्वसामान्यांना या मेट्रो सेवेची प्रतीक्षा आहे. गेल्या तीन वर्षांपासून मेट्रो सुरू होईल, असे सांगण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्षात मेट्रोसेवेस आणखी वर्षभराचा कालावधी लागले, अशी स्थिती आहे.

### 17 स्थानकांचे कामे अपूर्णच

» मेट्रोच्या 23 पैकी 17 स्थानकांची कामे सुरूच आहेत. मात्र, डेपोचे 80 टक्के काम पूर्ण झाले आहे. टप्प्याटप्प्याने मेट्रोच्या लाईनवर रुळ टाकण्याचे कामदेखील सुरू आहे. तर, 6 स्थानकांचे काम अद्याप हाती घेतले नसल्याचे दिसून आले.

---

# महापालिकेसाठी शिवसेनेचा जास्त जागांवर दावा; उद्योगमंत्री उदय सामंत यांचे स्पष्टीकरण

## 'मी आहे म्हणून पक्ष आहे, माझ्यामुळे पक्ष आहे, असा कोणी विचार करत असेल तर ते चालणार नाही'

**पिंपरी | प्रतिनिधी**

जो प्रभाग पक्षाला अनुकूल आहे तो सोडवून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी बैठक घेऊन चर्चा केली जाईल, असे सांगून उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, की निवडणुकींना सामोरे जाण्यासाठी कार्यकर्त्यांनी तयार राहिले पाहिजे. पिंपरी-चिंचवडमध्ये पक्षाची ताकद वाढविण्यासाठी सभासद नोंदणी करावी लागणार आहे. मी आहे म्हणून पक्ष आहे, माझ्यामुळे पक्ष आहे, असा कोणी विचार करत असेल तर ते चालणार नाही.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय हालचालींना वेग आला आहे. शिवसेनेची दोन गटात विभागणी झाल्यानंतर शिंदे गटातील शिवसेनेने पिंपरी चिंचवड शहरासाठी जास्त जागांवर क्लेम केला आहे. त्यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शहराची धावती भेट घेतली. तसेच, प्रभागात ज्याची ताकद अधिक त्यालाच निवडणूक लढविण्याची संधी दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेच्या शिंदे गटाच्या वतीने पिंपरीतील एका हॉटेलमध्ये कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेण्यात आली, त्या वेळी मंत्री सामंत बोलत होते. व्यासपीठावर खासदार श्रीरंग बारणे, उपनेत्या सुलभा उबाळे, जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख निलेश तरस, युवा सेना सचिन विश्वजीत बारणे, मावळ जिल्हा संघटक राजेंद्र तरस यासह पदाधिकारी उपस्थित होते.



### विरोधकांनी उद्योजकांमध्ये संभ्रम करू नये

» 3 हजार कोटींचा प्रकल्प हा अन्य राज्यात जात असल्याबाबत चर्चा आहेत; पण प्रत्यक्षात दहोसामधून 15 लाख 70 हजार कोटींचा गुंतवणूक, हुंदयाईचा प्रकल्प, आईस्क्रिम कंपन्या, डेटा सेंटर राज्यात आणले, त्याची दखल घेणे आवश्यक आहे. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली आहे. एखादा प्रकल्प जात असेल तर, त्याच्या दहापट मोठा प्रकल्प निश्चित आणू. त्यावरती विनाकारण बोलून विरोधकांनी उद्योजकांमध्ये संभ्रम करू नये, असे उद्योगमंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

### शहराध्यक्षांना अधिकार नाही

» राज्याच्या उद्योगमंत्री असूनही मी युतीच्या बाबतीत बोलू शकत नाही. तर, युतीमधील पक्षाच्या शहरप्रमुखांनी यावर भाष्य करायला नको. महायुतीचा निर्णय हे तीनच नेते घेणार आहेत. इतर कोणालाही पक्षाने अधिकार दिलेला नाही, असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी युती संदर्भातील प्रश्नांवर स्पष्ट केले.

# भाडेकरार नसल्यास घर मालकावर गुन्हा दाखल करणार

## असा इशारा पौड पोलिसांनी मुळशीतील घरमालकांना दिला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पौड पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या सर्व गावातील नागरिकांना घर भाड्याने देताना विशेष काळजी घ्या, भाडेकरूंची सर्व माहिती नजीकच्या पोलीस ठाण्यात द्या, जर भाडेकरू परराज्यातील तसेच गुन्हागार प्रवृत्तीचा आढळला तर थेट गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा पौड पोलिसांनी मुळशीतील घरमालकांना दिला आहे.

काही दिवसापूर्वी पौड येथील झालेल्या अन्नपूर्णा देवीची विटंबना एक मुस्लिम मुलाने केली होती. त्यामुळे पौड येथील वातावरण तणावपूर्ण होते यावेळी विटंबना करणारा मुलगा हा परप्रांतीय होता तो ज्या भाड्याच्या घरात राहत होता. त्याचे कोणतेही भाडेकरार केलेला नव्हता व मालकाने कोणतेही पुरावे पाहिले नसल्याचे निदर्शनास आल्याने त्या घरमालकावर पौड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यामुळे पौड पोलिसांनी याबाबत कडक कारवाई करण्याचे हाती घेतले आहे. यामध्ये घर मालकाकडे भाडे करार नसल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार आहेत.



### पोलिसांना माहिती कळवणे आवश्यक

» आपल्या घरात राहायला जागा देतात आणि त्यांच्याकडून कोणताही प्रकारचे भाडेकरार करून घेत नाही तसेच याची माहिती स्थानिक ग्रामपंचायत, सरपंच, पोलीस पाटील व पोलीस स्टेशनला कळवली जात नाही. यामुळे अनेक गुन्हेगार आपल्या परिसरात व घरात आश्रय घेत असतात. त्यामुळे याबाबत पोलिसांना माहिती कळवणे आवश्यक आहे.

पोलीस पाटील व सरपंच यांनी आपल्या गावातील भाडेकरू यांची माहिती गोळा करून ज्यांचे भाडेकरार नाही अशांची माहिती तसेच ज्या घरमालकांनी भाडेकरार केला आहे त्याची प्रत स्थानिक पोलीस स्टेशन व ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे.

घर मालक भाडेकरू यांची माहिती न घेता काही जास्त भाडे मिळते म्हणून नागरिक आपले घर भाड्याने देत असतात अशावेळी कोणतेही कागदपत्रे ओळखीचा पुरावा आधार कार्डची पाहणी न करता आपल्या घरात राहायला जागा देतात आणि त्यांच्याकडून कोणताही प्रकारचे भाडेकरार करून घेत नाही तसेच याची माहिती स्थानिक ग्रामपंचायत, सरपंच, पोलीस पाटील व पोलीस स्टेशनला कळवली जात नाही. यामुळे अनेक गुन्हेगार आपल्या परिसरात व घरात आश्रय घेत असतात. त्यामुळे याबाबत पोलिसांना माहिती कळवणे आवश्यक आहे.

घर, जमीन किंवा दुकान दुसऱ्याला भाडेतत्वावर देण्यापूर्वी भाडेकरूशी करार आणि पडताळणी करणे अत्यंत महत्त्वाचे व अनिवार्य काम आहे. गेल्या काही वर्षांत मालमत्तांवर बेकायदेशीर ताबा करण्याच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने या कायदेशीर कागदपत्रांची उपयुक्तता वाढली आहे. तुमची कोणतीही मालमत्ता भाड्याने देण्यापूर्वी ज्याप्रमाणे भाडे करार करून घेणे आवश्यक त्याचप्रमाणारे, पोलिस पडताळणीही अत्यंत महत्त्वाची आहे. पण अनेक वेळा लोक भाडे करार करतात पण पोलिस पडताळणीकडे दुर्लक्ष करतात. अशा स्थितीत भाडेकरूची कोणतेही बेकायदेशीर काम केल्याचे आढळल्यास घरमालकालाही कायदेशीर कारवाईचा धोका होऊ शकतो. त्यामुळे भाड्याने घर, जमीन किंवा दुकान देण्यापूर्वी पोलीस पडताळणीचे महत्त्व जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

### जनजागृती आवश्यक

» स्थानिक पोलीस पाटील व सरपंच यांनी आपल्या गावातील भाडेकरू यांची माहिती गोळा करून ज्यांचे भाडेकरार नाही अशांची माहिती तसेच ज्या घरमालकांनी भाडेकरार केला आहे त्याची प्रत स्थानिक पोलीस स्टेशन व ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे.

> पौड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सर्व गावांमधील घरमालक यांनी आपल्या घरात राहणाऱ्या भाडेकरूबाबत स्थानिक पोलीस स्टेशनला भाडेकरार ची प्रत व त्यांची ओळखपत्र देऊन माहिती देणे आवश्यक आहे. भाडेकरार न करता कोणी आढळून आल्यास अथवा माहिती समजल्यास त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल वाढीव भाडे मिळते म्हणून कोणालाही घर भाड्याने देऊ नका. ही कारवाई टाळण्यासाठी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
>
> - संतोष गिरीगोसावी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पौड पोलीस स्टेशन

# रेल्वे स्थानकावरील तिकीट विक्री खिडकी बंद

## लोणी काळभोरमध्ये प्रवाशांना भुर्दंड, रेल्वेचे आर्थिक नुकसान

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर लोहमार्गावरील लोणी काळभोर येथील रेल्वे स्थानकावरील तिकीट विक्रीची खिडकी वारंवार बंद रहात असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. तिकीट न मिळाल्याने प्रवाशांना विनातिकिट असल्याने चेकरने पकडल्यानंतर दंड भरावा लागत आहे. रेल्वेचे ही आर्थिक नुकसान होत असल्याने रेल्वे प्रशासनाने या बाबतीत तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

16 मे रोजी शुक्रवारी तिकीटविक्री खिडकी बंद असल्याने प्रवाशांना तिकिटाशिवाय प्रवास करावा लागला. नागरिकांनी रेल्वे अधिकाऱ्यांना तिकिट खिडकी वारंवार बंद असण्याबाबत विचारणा केली असता, कंत्राटी कर्मचाऱ्यांचा करार संपल्यामुळे ते कामावर आले नसल्याचे उडवाउडवीची उत्तरे प्रवाशांना देण्यात आली. तिकिट विक्री खिडकी बंद केल्याने प्रवाशांना तिकिट खरेदी करण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे.



लोणी काळभोर रेल्वे स्थानक हे लोणी काळभोर, कदमवाक वस्ती, कुंजीरवाडी आणि थेऊर यांसह आसपासच्या गावांतील प्रवाशांसाठी एक प्रमुख स्थानक आहे. अनेक प्रवासी कामासाठी पुणे आणि दौंड येथे जातात आणि या स्थानकावर प्रवास करणाऱ्यांची संख्या अधिक असते. लोणी स्थानकावरून धावणाऱ्या गाड्या दौंड- पुणे - दौंड, पुणे - दौंड - बारामती डेमू, पुणे - सोलापूर पॅसेंजर ट्रेनसह अनेक गाड्या लोणी स्थानकावरून धावतात. तथापि तिकिट काउंटर वारंवार बंद राहिल्याने प्रवाशांची गैरसोय होत असून तिकिटाशिवाय प्रवास केल्याबद्दल दंड भरावा लागत आहे.

गर्दीच्या वेळी तिकिट विक्री खिडकी बंद ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर रेल्वे प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी प्रवासी करत आहे. रेल्वे प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि कर्तव्यात निष्काळजीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी विनंतीही प्रवाशांनी केली आहे.

### सात गाड्यांमधून विनातिकिट प्रवास

» तिकीट विक्री खिडकी बंद असल्याची बाब प्रवाशांनी लोणी काळभोर रेल्वे स्थानकाचे प्रबंधक अजय पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर, त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यांनी तातडीने वाणिज्य विभागाचा एक कर्मचारी लोणी काळभोर रेल्वे स्थानकावर पाठवला. सकाळी 9:30 वाजता तिकीट विक्री खिडकी पुन्हा सुरू करण्यात आली. तथापि, बंद तिकीट विक्री खिडकीमुळे सकाळी साडेचार ते साडेनऊ दरम्यान डेमू, सोलापूर पॅसेंजर, बारामती डेमू, अशा एकूण 7 गाड्या विनातिकीट गेल्या असल्याची माहिती काही प्रवाशांनी दिली.